## प्रकरण पाच

### चित्रपट क्षेत्रातील व्यक्तिमत्वे

कोल्हापूरात चित्रपटसृष्टीच्या स्थापनेस व विकासास अनेक व्यक्तींनी हातभार लावला. चित्रपट निर्मितीच्या प्रक्रीयेतील अनेक क्षेत्रात या व्यक्तींनी आपले योगदान दिल्याने चित्रपटसृष्टीचा विकास घडून आला. त्या सर्व व्यक्तींच्या कारकिर्दीचा आढावा घेणे अशक्यप्राय आहे. त्यामुळे या क्षेत्रात भरीव कामगिरी करणा-या कांही व्यक्तींच्या कामगिरीचा उल्लेख केला आहे.

**पेंटर बंधू :**

आनंदराव पेंटर यांचा जन्म १८९० साली झाला. चित्रकलेत आवड असल्याने चित्रकार म्हणून त्यांनी आपली कारकिर्द सुरु केली.[१] त्यांचे मावसबंधू बाबूराव कृष्णराव मेस्त्री यांचा जन्म ३ जून, १८९० मध्ये कोल्हापूरात झाला.[२] त्यांचे मूळ गांव म्हागोंड सोडून त्यांचे वडिल व्यवसायासाठी कोल्हापूरात स्थायिक झाले. त्या काळात चित्रकाराला पेंटर म्हणून संबोधले जाऊ लागल्याने बाबूरावांना देखील लोक पेंटर म्हणू लागले.[३] पुढे बाबूराव पेंटर हेच त्यांचे नांव रूढ झाले. जरी, त्यांचे शिक्षण चौथी-पाचवी पर्यंतच झाले असले तरी वडिलांकडून कोरीवकाम, चित्रकला, सुतारकी, यांत्रिकी यांचा वारसा त्यांना लाभला.[४] आनंदराव पेंटर यांच्या सहवासात त्यांनी छायाचित्रकलेत रस घेतला. बाबूरावांचा विवाह १९०७ मध्ये झाला.[५] आनंदराव पेंटर व बाबूराव पेंटर या दोघांनाही चित्रकलेत रस होता.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

या दोन्ही भावांनी प्रथम: तैलचित्रे काढून अर्थार्जन केले. केशवराव भोसल्यांनी स्थापन केलेल्या " ललित कलादर्शन " नाटक कंपनीच्या स्थापने-मुळे त्या कंपनीच्या नाटकाचे पडदे करण्याचे काम या दोन भावांनी पैजेवर स्विकारले. [६] आनंदरावांकडे चित्रकला शिकण्यासाठी येणारे विष्णूपंत दामले यांनी नंतर बाबुरावांना देखील आपले गुरु मानले. [७] केशवराव भोसल्याचे हुबळीचे एक श्रीमंत चाहते, शंकरराव वाशीकर यांच्या भागीदारीत आनंदराव पेंटरानी कोल्हापूरात " डेक्कन सिनेमा " नावाचे चित्रपटगृह सुरु केले. [८] येथे साहेबमामा फत्तेलाल हे देखील आनंदराव व बाबूराव याचे चित्रकलेतील शिष्य झाले. त्यामुळे बाबुराव व आनंदराव यांना अनेक परदेशी चित्रपट पाहून चित्रपट निर्मितीच्या कांही कल्पना आल्या. [९] पण चित्रपट संस्था काढण्यासाठी वाशीकर भांडवल देण्याची शक्यता नसल्याने आनंदरावांनी १९१३ मध्ये डेक्कन मधील भागीदारी सोडली. याच सुमारास " राक्षसी महत्वकांक्षा " या नाटकाचे पडदे व देखावे तयार करण्यासाठी केशवराव भोसल्यांनी पेंटर बंधुंना मुंबईला बोलाविले. [१०] मुंबईच्या मुक्कामात बाबूरावांनी अनेक परदेशी मुकपट पाहिले.

कोल्हापूरास परतल्यानंतर त्यांनी एक रसिक सावकार पुत्र व बाबुराव रूईकर यांच्या भागीदारीत १९१३ च्या शेवटी " महाराष्ट्र सिनेमा " या चित्रपटगृहाची स्थापना केली. [११] चित्रपटगृहातील रंगीत देखावे व सजावट पाहून शाहू महाराजांनी " अरं, ह्यो पेंटर हाय का जादूगार ? " असे उद्‌गार काढले. [१२] दादासाहेब फाळकेंचे अनेक चित्रपट दाखविण्यासाठी कोल्हापूरात आणले. त्यामुळे पेंटर बंधूना फाळकेंच्या तंत्राचाही अभ्यास करता आला. त्यांनी एक थोडासा नादुरूस्त विल्यमसन छायाचित्रक मुंबईस मिळविला

व तो दुरुस्त करून, कांही दृश्ये चित्रित केली. स्वत:च्या चित्रफित धुणे वगैरे गोष्टी करून चित्रपटगृहात त्या पाहिल्या. [१३] त्या फारशा यशस्वी नसल्या तरी नुसती दिशा कळण्यास मदत झाली.

आनंदराव पेंटर यांनी स्वत: छायाचित्रक तयार करण्यात थोडेफार यश मिळविले. पण दुर्दैवाने २२ ऑक्टोबर, १९१५ रोजी त्यांचे अचानक निधन झाले. [१४] त्यामुळे चित्रपट निर्मितीची संपूर्ण जबाबदारी बाबूराव पेंटर यांच्यावर येऊन पडली. आनंदरावांच्या मृत्यूवेळी मी फिल्म कंपनी काढीन, असे वचन बाबूराव पेंटर यांनी दिले. वचनाप्रमाणे १९१७ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " ची स्थापना केली. [१५]

१९१७ मध्ये कॅमेरा तयार करण्यात बाबूरावांना थोडे यश मिळाले. त्यानंतर पोहण्याची दृश्ये यशस्वीरित्या घेतली व ती पाहून यश फार दूर नाही याची त्यांनी खात्री झाली. [१६] त्यानंतर १९१८ साली कॉंग्रेसच्या मुंबई येथील अधिवेशनाचे त्यांनी यशस्वी चित्रण करून त्यांनी " सैरंध्री " हा चित्रपट काढायचे ठरवून चित्रिकरणास सुरुवात केली.

१९२० साली प्रदर्शित झालेला " सैरंध्री " हा चित्रपट " महाराष्ट्र फिल्म कंपनी " चा व बाबूराव पेंटर यांचाही पहिला चित्रपट होय. [१७] या चित्रपटाच्या जाहिरातीचे मोठमोठे फलक बाबूरावांनी रंगविले व जाहिरातीचे फलक लावण्याची प्रथा सुरु केली. [१८]

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " तर्फे बाबूरावांनी पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक विषयांवरील १७ चित्रपटांची निर्मिती केली, पण भागीदारातील मतभेदामुळे त्यांनी १९३० ला चित्रपट संस्था सोडली. [१९]

" महाराष्ट्र फिल्म कंपनी " मधून बाहेर पडल्यानंतर कांही काळ ते चित्रकला व शिल्पकलेत गुंतून पडले.[२०] याच वर्षी त्यांनी " आनंद फिल्म कंपनी " चा " प्रेमसंगम " या चित्रपटाचे दिग्दर्शक म्हणून चित्रपट क्षेत्रात पुन: प्रवेश केला.[२१]

कोल्हापूर व्यतिरिक्त " बालगंधर्व - स्ईकर प्रॉडक्शन " चा " अमृतसिध्दी " हा चित्रपट १९३७ साली, " प्रदीप पिक्चर्स " चा " रुक्मिणी स्वयंवर " हा चित्रपट १९४५ साली त्यांनी मुंबई येथे दिग्दर्शित केला. मुंबईच्याच " सिर्को " व " राजकमल " या संस्थेचे " महात्मा विदूर " [१९४६] व " रामजोशी " [१९४७] हे चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केले.[२२]

बाबूराव पेंटरनी एकूण २६ चित्रपट दिग्दर्शित केले. यापैकी सतरा चित्रपट हे मूकपट व नऊ चित्रपट बोलपट होते.[२३] त्यांनी पौराणिक, धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक, ग्रामीण जीवन, कौटुंबिक, यासारख्या अनेक विषयांवर चित्रपट दिग्दर्शित केले. कथा, कला, दिग्दर्शन, अभिनय, सजावट, वेशभूषा, इत्यादी सर्व बाबतीत त्याचे चित्रपट सुंदर व कलात्मक असत. ते कुशल तंत्रज्ञ असल्यामुळे छायाचित्रक तयार करण्यापासून ते इतर अनेक तांत्रिक बाजूस ते कौशल्याने हाताळत असत.[२४] मोटर दुरूस्ती व चित्रपट निर्मिती ही दोन्ही कामे वेगवेगळी व अवघड असली तरी, बाबूराव पेंटर हे अतिशय एकाग्रपणे व मन लावून ही दोन्ही कामे तितक्यात हिरीरीने करीत असत.

चित्रपटातील काळानुसार व दृश्यानुसार हुबेहुब वेशभूषा व रंगभूषा, देखावे, हे देखील त्यांच्या चित्रपटाचे वैशिष्ठ्य होय.[२५] उदा. ऐतिहासिक चित्रपट असेल तर त्याच काळातील पोशाख, त्या काळातील युध्द असेल तर

त्यानुसार रणांगण, सैनिकांचे पोशाख, शस्त्रे, लढायची पध्दत इत्यादी गोष्टींमुळे प्रत्यक्ष त्या काळात व त्या प्रसंगात जाऊन आपण सदर प्रसंग अनुभवतो व पहातो आहे, असाच प्रेक्षकांना भास होई.

कांही वेळेला चित्रकलेत ते इतके रंगून जात की, नट-नटी रंगून तयार असल्या तरी, त्यांना भान रहात नसे. कांही वेळा शिकारीला निघून जात, त्यामुळे चित्रिकरणासाठी लोक अवघडून बसत. [२६] यामुळे वेळ, पैसा, फुकट जाऊन लोकांच्या शक्तीवर ताण पडे.

मूक चित्रपटाच्या काळात त्यांना जे नांव मिळाले, तसे त्यांना बोलपटाच्या युगात मिळू शकले नाही. याचे कारण, ग. रं. भिडे यांच्या मते [२७] या काळात निर्मितीची सूत्रे त्यांच्या हातात राहीली नाहीत. दुस-याने बोलाविले तर बोलपट काढावयाचा, यामुळे कामात सातत्य राहिले नाही. [२८] त्यामुळे चरितार्थ चालविण्यासाठी ते चित्रकला, शिल्पकला याकडे वळले. सतत एखादी गोष्ट न करता आल्यामुळे बोलपटाच्या युगात ते मागे पडले असावेत.

असे असले तरी, शिल्पकार, चित्रकार, तंत्रज्ञ असणा-या बाबूराव पेंटर यांनी चित्रपट क्षेत्रातही मोलाची कामगिरी केली. त्यांच्या हाताखाली शिकून अनेक अभिनेते, दिग्दर्शक व तंत्रज्ञ यांनी संपूर्ण भारतात नांव मिळवले.

## बाबूराव पेंढारकर :

चित्रपट निर्माते, वितरक, अभिनेते व व्यवस्थापक अशा अनेक क्षेत्रात प्रसिध्दी पावलेले श्री. बाबूराव पेंढारकर हे नांव सर्वांना परिचित आहे.

श्री. पेंढारकरांचा जन्म २९ जून, १८९६ रोजी कोल्हापूर येथे झाला. [२९] लहानपणी त्यांना खेळायची फारशी आवड नव्हती, पण इयत्ता तिसरी - पासून असताना बाळासाहेब यादव त्यांनी सकाळी लवकर उठवून व्यायाम करवून घेऊ लागल. त्यामुळे हळूहळू कुस्ती खेळण्यात पटाईत झाले. [३०] स्कूल फायनलपर्यंत शिक्षण झाल्यावर पन्हाळ्याच्या शाळेत इंग्रजी या विषयाच्या शिक्षकाची नोकरी करु लागले. तेथे ते मुलांची शिकवणीही घेत असत. [३१] १९१६ साली पेंढारकर विवाहबध्द झाले. [३२] पन्हाळ्याची नोकरी सोडल्याने कोल्हापूरातच एका दवाखान्यात त्यांनी परिचारकाची [कंपौंडर] नोकरी सुरु केली. [३३] पण कांही कारणास्तव ती नोकरीही सोडावी लागली.

पुढे ते गजेंद्रगड या ठिकाणी एका जहागिरदाराच्या मुलाला इंग्रजी शिकविण्यासाठी गेले, पण पुढे तीही नोकरी त्यांनी सोडली. [३४] १९१९ ला " महाराष्ट्र फिल्म कंपनी " चे व्यवस्थापक म्हणून ते काम पाहू लागले. [३५] या चित्रपट संस्थेच्या " सैरंध्री " या पहिला चित्रपटात त्यांनी श्री विष्णूची भूमिका केली. [३६] चित्रपट पूर्ण होईपर्यंत व्यवस्थापक म्हणून ते पडेल ते काम पहात व चित्रपट पूर्ण झाल्यावर प्रतिनिधी [रिप्रेझेंटेटीव्ह] चे काम करीत असत. [३७] चित्रफितीची पेटी घेऊन ते गावोगाव फिरत असत. ज्या शहरात चित्रपट लावायचा, त्या शहरात बहुसंख्य लोक कोण आहेत ? त्यांचे सण कोणते ? यांची माहिती ते मिळवित, त्याचप्रमाणे ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, अद्भूतरम्य यापैकी कोणते चित्रपट लोकांना आवडतात, या सर्व गोष्टींची माहिती ते मिळवीत असत. [३८] श्री. व्ही. शांताराम यांनादेखील त्यांनी " महाराष्ट्र फिल्म कंपनी " त आणले. [३९] १९२३ साली प्रदर्शित झालेल्या " सिंहगड " हा चित्रपट इंग्लंडच्या वेंबले प्रदर्शनात दाखवून त्यांनी पैसे मिळविल्याचा खोटा आरोप त्यांच्यावर करण्यात आल्याने त्यांनी

सदर प्रदर्शनाच्या प्रमुखांना पोलिटिकल एजंटमार्फत पत्र लिहीले. " सिंहगड " नावाचा चित्रपट हिंदुस्थानातून आलेलाच नाही, असे उत्तर आल्यावर, आपल्यावरील आरोप खोटा आहे, हे सिध्द झाल्यावर बाबूरावांनी " महाराष्ट्र फिल्म कंपनी " सोडली.[४०] यानंतर काय करायचे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला.

१९२४ साली त्यांनी पुण्याच्या " डेक्कन पिक्चर्स कार्पोरेशन " या चित्रसंस्थेत प्रवेश केला व १९२५ ला त्यांनी ही चित्रपट संस्था सोडली.[४१] १० मे, १९२६ ला भालजी पेंढारकर व पार्श्वनाथ आळतेकर यांच्या समवेत त्यांनी मुंबई येथे " वंदे मातरम् फिल्म कंपनी " काढली. याच वर्षी " वंदे मातरम् " नावाचा चित्रपटही प्रदर्शित झाला. पण अभ्यवेक्षण मंडळाने त्यातील अनेक दृश्ये कापल्याने चित्रपटाचे स्वरूपच बदलले.[४२] त्यामुळे त्याचा परिणाम उत्पन्नावरही झाला. चित्रपट संस्था बंद करून बाबूराव पुन्हा कोल्हापूरला परतले. गजेंद्रगडला ज्या मुलाला त्यांनी शिकविले, तो सोंडूरचा राजा झाल्याने त्याने बाबूरावांना सोंडूरला बोलाविले. ते तेथे कांही दिवस राहून कोल्हापूरला परतले. पुढे कांही दिवस गडहिंग्लजला राहिले.[४३] यानंतर ते परत कोल्हापूरला आले.

१९२९ ला " प्रभात फिल्म कंपनी " ची कोल्हापूरात स्थापना झाल्यानंतर ते या संस्थेत व्यवस्थापक म्हणून काम पाहू लागले.[४४] " प्रभात फिल्म कंपनी " च्या व्यवस्थापनाबरोबरच १९३० साली " बजरबट्टू " या चित्रपटात १९३१ ला " जुलूम " या चित्रपटात व १९३२ साली " अयोध्येचा राजा " या चित्रपटात खलनायकाची कामे केली. १९३३ ला " सीता कल्याणम् " या तामिळ बोलपटाचे त्यांनी दिग्दर्शनही केले. " प्रभात " च्या

" अग्निकंकण ", " मायामच्छिंद्र " व " सिंहगड " या चित्रपटातही त्यांनी भूमिका केल्या. [४५] " प्रभात फिल्म कंपनी " ने १९३३ ला पुण्यास स्थलांतर केले. तेंव्हा पगारवाढ देण्याचे नाकारल्याने बाबूरावांनी ती चित्रपट संस्था सोडली. [४६]

कोल्हापूरात १९३३ ला " कोल्हापूर सिनेटोन " ची स्थापना झाल्यानंतर पेंढारकरांना बोलाविण्यात आले. [४७] नट व व्यवस्थापन ही दोन्ही कामे ते पाहू लागले. या चित्रपट संस्थेच्या " आकाशवाणी " व " विलासी ईश्वर " या दोन चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. [४८] वितरण संस्थेचे महत्व पेंढारकरांनी दादासाहेब निंबाळकरांना पटवून दिले व त्यामुळे मुंबई येथे १९३४ ला वितरण संस्थेची स्थापना करण्यात आली. [४९] चित्रपट निर्मितीतील प्रशासकीय अधिका-यांच्या हस्तक्षेपामुळे बाबूराव पेंढारकरांनी " कोल्हापूर सिनेटोन " १९३५ ला सोडली. [५०] चित्रपट संस्थात काम केल्याने त्यांना या क्षेत्रातील भरपूर माहिती व अनुभव मिळाला.

चित्रपटाबद्दलची बरीचशी माहिती झाल्याने स्वत:ची चित्रपटसंस्था काढण्याचे त्यांनी ठरविले. त्यांनी छायाचित्रकार पांडुरंगराव नाईक व स्वत:चे बंधू मा. विनायक यांच्या समवेत १९३६ ला " हंस पिक्चर्स " ची स्थापना केली. [५१] पहिल्या चित्रपटासाठी चंदुलाल शहा यांच्याकडून भांडवल मिळविले व कोल्हापूरात चित्रपट निर्मितीगृह मिळणे अवघड असल्याने पुण्याचे " सरस्वती सिनेटोन " चे चित्रपट निर्मितीगृह भाडयाने घेतले. तीन महिन्यात " छाया " हा चित्रपट पूर्ण केला, त्यात त्यांनी भूमिकांही केली. [५२] छाया चे कथालेखक म्हणून वि. स. खांडेकरांना कलकत्ता प्रेस असोसिएशन कडून बक्षिस मिळाले. [५३] " हंस पिक्चर्स " च्या स्थापनेपासून स्वत:ची प्रकाशनसंस्था सुरु करण्याची इच्छा पेंढारकरांच्या मनात होती. त्यांनी श्री. सामंत यांच्याबरोबर मुंबई येथे " पिअरलेस पिक्चर्स " या प्रकाशन

संस्थेची स्थापना केली.[५४] यामार्फतच " छाया " हा चित्रपट प्रकाशित झाला. " हंस " या " धर्मवीर " हा दुसरा चित्रपट मुंबईला चित्रित करण्यात आला. पण यानंतरचे चित्रपट मात्र कोल्हापूरात काढण्यात आले. " हंस " तर्फे सामाजिक, ऐतिहासिक असे एकूण दहा चित्रपट निर्मित केले गेले.[५५] त्यातील कांही चित्रपटात पेंढारकरांनी भूमिकाही केल्या.

१ फेब्रुवारी, १९४० साली " हंस पिक्चर्स " चे रुपांतर " नवयुग चित्रपट लिमिटेड " मध्ये करण्यात आले.[५६] या संस्थेचे मुख्य कार्यालय पुणे येथे होते. या चित्रपट संस्थेतर्फे १९४० साली " लपंडाव " हा चित्रपट सादर झाला.[५७] या चित्रपटात बाबूराव पेंढारकरांनी ठेकेदाराची भूमिका केली. या संस्थेच्या संचालक मंडळात मतभेद झाल्याने संचालक मंडळाचा राजिनामा त्यांनी दिला, पण नट म्हणून संस्थेशी करार झाला असल्याने, " अमृत " या १९४१ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटात त्यांनी भूमिका केली.[५८] यानंतर मात्र या संस्थेतील चित्रपटात त्यांनी काम केले नाही.

१९४१ ला " नवयुग चित्रपट लिमिटेड " ही संस्था सोडल्यानंतर त्याच वर्षी " न्यू हंस पिक्चर्स " ची स्थापना पेंढारकरांनी केली.[५९] " न्यू हंस पिक्चर्स " चा"पहिला पाळणा" हा सामाजिक चित्रपट १९४२ ला सादर झाला, तर त्याच वर्षी " भक्त दामाजी " हा संतपट प्रस्तुत केला गेला. या संस्थेने " पैसा बोलतो आहे " हा चित्रपट १९४३ ला निर्मित केला. या तीनही चित्रपटात बाबूराव पेंढारकरांनी भूमिका केला.[६०] यानंतर " न्यू हंस पिक्चर्स " पंचवीस लाखाची लिमिटेड करण्याची तयारी सुरु झाली. " न्यू हंस लिमिटेड " ची स्थापना मुंबईच्या सेंट्रल स्टुडिओत १९ ऑगस्ट, १९४३ ला गोविंद सक्सेरिया, बाबूराव पटेल, पारकर व

बाबूराव पेंढारकर या चौघांच्या भागीदारीत झाला.[६१] पण " द्रौपदी " चित्रपटात स्त्री कलाकार म्हणून कोणाला घ्यायचे, या प्रश्नावरून भागीदारां-मध्ये मतभेद झाल्याने त्यांनी संस्था सोडली.[६२]

यानंतर १९४६ पासून पुढे त्यांनी " प्रकाश ", " रणजीत ", " राजकमल ", " एस् ॲण्ड टी ", " प्रभाकर पिक्चर्स " या चित्रपट संस्थेच्या चित्रपटातून भूमिका करण्यास सुरुवात केली.[६३] १९४७ साली कोल्हापूरात स्थापन झालेल्या " मंगल पिक्चर्स " या संस्थेचा पहिला चित्रपट " जय मल्हार " हा बाबूराव पेंढारकरांनी काढून दिला व त्यात कामही केले.[६४] पुढेही त्यांनी अनेक चित्रपटातून कामे केली.

१९४९ साली मुंबई येथे मराठी ग्रंथ संग्रहालयातर्फे झालेल्या नाट्य - महोत्सवात " झुंझारराव " या नाटकातील झुंझारराव ही प्रमुख भूमिका करून रंगभूमीवरही पदार्पण केले.[६५] अशा रितीने अनेक चित्रपटातून व नंतर नाटकातूनही नट म्हणून त्यांनी नांव मिळविले, असे दिसून येते.

बाबूराव पेंढारकर हे व्यवहारदक्ष व्यवस्थापक होते, तरीही " नवयुग चित्रपट लिमिटेड ", " नवहंस चित्रपट लिमिटेड " या चित्रपट संस्थांच्या लोकांतही मतभेद निर्माण झाले, हे मात्र मान्य करावे लागेल. असे असले तरी बाबूराव पेंढारकरांनी चित्रपटसृष्टीला दिलेले योगदान मात्र अत्यंत महत्वपूर्ण व उल्लेखनीय आहे.

## भालचंद्र पेंढारकर :

चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, कथा, पटकथा व गीत, संवाद लेखक

म्हणून प्रसिध्द पावलेल्या श्री. भालजी पेंढारकरांचा जन्म कोल्हापूरात २ मे, १८९८ ला झाला.[६६] शाळेत त्यांना अभ्यासापेक्षा नाटके, खेळ व कुस्त्या याचीच जास्त आवड होती, तरीदेखील मराठी विषय त्यांचा आवडता होता व त्यात त्यांना गुणही चांगले मिळायचे.[६७] लहानपणापासून त्यांना अभिनयाची आवड होती, ही गोष्ट त्यांच्या मावशीचे यजमान, राजारामबापू वणकुद्रे यांच्या लक्षात आली.[६८] भालजींनी शाळेतल्या नाटकात सवाई माधवरावाची केलेली भूमिका त्यांनी पाहिली होती. यासाठी त्यांनी भालजींची " लक्ष्मीप्रसाद " नाटयगृहातील अनेक नाटकवाल्यांशी ओळख करुन दिली.[६९] सहावी नापास झाल्यानंतर भालजी नोकरीसाठी घराबाहेर पडले.[७०] यानंतर काय करायचे ? व कोठे जायचे हे प्रश्न त्यांच्यासमोर आले.

सुरुवातीस तालमीत, नंतर कोल्हापूरच्या राजदरबाराचे गायक अल्लादियाँ खाँ यांच्या घरी भालजी राहू लागले.[७१] या काळात अल्लादियाँ खाँ याचे गाणे ऐकून त्याचे कान तयार झाले व नाटकांच्या तालमी पाहून, अभिनयातील बारकावे देखील त्यांना कळू लागले. त्यामुळे नाटक मंडळी त्याना अभिनय शिकविण्यासाठी आमंत्रणे देवू लागली.[७२] एका छापखान्यात कामाला जायलादेखील त्यांनी सुरुवात केली.[७३] " अप्सरा संगीत मंडळी " त त्यांना नाट्य शिक्षकाची नोकरी मिळाली. अल्लादियाँ खाँ मुंबईला गेल्याने बाळासाहेब यादवांच्या घरी भालजी राहू लागले.[७४] पुढे सोनतळी कॅम्पमध्ये राहण्यासाठी बाळासाहेबाना शाहू महाराजानी बोलाविल्याने रहायचे कोठे ? हा प्रश्न भालजींना पडला.[७५] १९१६ साली भालजी पुण्याला आले. लोकमान्य टिळकांच्या " केसरी " या वर्तमानपत्राच्या कार्यालयात त्यांना जागा व वर्तमानपत्रे वाटण्याचे काम मिळाले.[७६]

तिथेच त्यांनी अनेक ग्रंथ, पुस्तके याचे वाचन केले. पण लोकमान्य टिळक सिंहगडला गेल्याने भालजींनी १९१७ साली पुणे सोडले व रुकडी, रायबाग, असे फिरुन कोल्हापूरला आले. [७७] तेथे ते सैन्यात दाखल झाले. १९२० साली सैन्यातून बाहेर पडल्यावर परत रुकडीला आहे. [७८]

पुण्याला गेल्यानंतर लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर लोकमान्यांचा " स्वर्गीय संदेश " ही पुस्तीका त्यांनी लिहीली व अनेक वर्तमानपत्रात स्फूटे लिहीणे देखील त्यांनी सुरु केले. [७९] तेथे " लक्ष्मी " व " अपोलो " चित्रपटगृहामध्ये इंग्रजी पाटयाचे [टायटल्स] मराठीत भाषांतर करण्याचे काम मिळाले. तेथेच त्यांचा राजगुरु या थोर देशभक्ताशी परिचय झाला. [८०] कोल्हापूरात " महाराष्ट्र नाट्य मंडळ " स्थापन झाले होते व भालजींनी " राष्ट्रसंसार ", " क्रांती ", " आसुरी लालसा " या नाटकाचे देखील प्रयोग सुरु झाले होते. [८१] त्याचे नोकरीबरोबरच नाट्यलेखन व वर्तमान-पत्रातील लिखाण देखील सुरु होते.

शस्त्रे व दारुगोळा याचे ज्ञान वाढविल्याशिवाय महाराष्ट्रात सशस्त्र उठाव होऊ शकत नाही, हे भालजींच्या लक्षात आल्याने, पंजाबला जाण्याचे त्यांनी ठरविले. [८२] लाहोरला त्यांनी लाला लजपतराय यांनी स्थापलेल्या राष्ट्रीय विद्यापीठात जाऊन त्यांची भेट घेतली. कलकत्ता येथे ते थोर क्रांतीकारक अतुल सेन यांना भेटले, पुढे बनारसला हिंदू विद्यापीठात जाऊन पंडित मालवीयजींची भेट घेतली. [८३] पुण्यात परतल्यानंतर भालजी पुन्हा " लक्ष्मी सिनेमागृहा " चे काम पाहू लागले. [८४] याच काळात बाल गंधर्वांशी देखील त्याचे जवळचे संबंध आले.

कोल्हापूरला परतल्यानंतर " मार्कंडेय " या मूकपटाची कथा लिहीण्यास

त्यांना बाबुराव पेंटरनी सांगितले, पण लिखाणातील बाबूराव पेंटरनी सांगितलेले बदल त्यांना पटत नव्हते. त्यामुळे ते दादासाहेब तोरणे व बाबूराव पै यांचेबरोबर मुंबईला निघून गेले. [८५] १९२४ च्या दरम्यान भालजी " पृथ्वीवल्लभ " या मूकपटातील कलाकारांना अभिनय शिकविण्यासाठी बडोद्याला गेले. [८६] मुंबईला परतल्यानंतर १९२५ साली " बाजीराव मस्तानी " या चित्रपटाच्या लेखन व दिग्दर्शनाची कामगिरी त्यांनी स्विकारली. [८७] १९२६ साली बाबूराव पेंढारकर, भालजी व पार्श्वनाथ आळतेकर या तिघांनी मुंबईला " वंदे मातरम् फिल्म कंपनी " ची स्थापना लाहोर व बनारसमधील राष्ट्रीय शिक्षण मंदिराचा विषय " वंदे मातरम् आश्रम " या चित्रपटासाठी त्यांनी निवडला होता. [८८] पण अभ्यविक्षण मंडळाने हा चित्रपट सात वेळा पाहून प्रत्येकवेळी कात्री वापरल्याने निम्म्यापेक्षा जास्त चित्रपट कापून प्रदर्शित करण्यात आला. [८९] त्यामुळे चित्रपटाच्या यशावर त्याचा विपरीत परिणाम झाला.

भालजींनी बाबाराव सावरकरांची भेट घेऊन त्यांच्या तरुण हिंदुस्थान या मंडळात प्रवेश केला व क्रांतिकार्याची शपथ घेतली. भालजी नागपूर, अंमळनेर, अकोला, बनारस वगैरे ठिकाणी जाऊन जोखमीची कामे करु लागले. एकदा काशीला त्यांनी चंद्रशेखर आझादांची भेट घेतली. [९०] स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जे कार्य करता येणे शक्य होते ते त्यांनी कोणतीही भिती न बाळगता केले.

१९३१ साली " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " बाजबहाददर " अर्थात " राणी रुपमती " या मूकपटाचे लेखन व दिग्दर्शन भालजींनी केले. [९१] या आधी एक वर्ष म्हणजे १९३० ला भालजी विवाहबध्द झाले व " रानी रुपमती " या चित्रपटाच्या चित्रिकरणाच्या दरम्यान भगतसिंग, राजगुरु

व सुखदेव यांना फाशीची शिक्षा इंग्रज सरकारने दिली, त्यामुळे भालजींनी अस्वस्थ होऊन एक दिवस चित्रिकरण पुढे ढकलले.[१२] हिंदुत्वनिष्ठा हे तत्व असणा-या संघाच्या कार्याला भालजींनी वाहून घेतले होते.[१३] " चित्रपट " व स्वातंत्र्यासाठी हातभार लावणे, ही दोन्ही कार्ये भालजी करीत होते. १९३२ साली " सरस्वती सिनेटोन " च्या " श्यामसुंदर " या बोलपटासाठी कथा, पटकथा, संवाद व गीत लेखनाबरोबरच दिग्दर्शनही त्यांनी केले.[१४]

पुढे " श्याम सिनेटोन ", " कोल्हापूर सिनेटोन ", " सरस्वती सिनेटोन ", " शालिनी सिनेटोन ", " प्रिन्स शिवाजी प्रॉडक्शन ", " अरुण पिक्चर्स " या चित्रपट संस्थांच्या अनेक चित्रपटांच्या कथा, पटकथा, संवाद व गीत लेखन करुन दिग्दर्शनही भालजीनी केले.[१५] " प्रभात फिल्म कंपनी " च्या १९३० साली निघालेल्या " राणी साहीबा " चे कथानकही भालजीनी लिहीले. १९४१ मध्ये " फेमस अरुण चित्र " च्या " थोरातांची कमळा " या ऐतिहासिक चित्रपटाचे कथा, पटकथा, संवाद व गीत लेखना - बरोबरच दिग्दर्शनही भालजींनी केले. बाबूराव पेंढारकरांच्या " नवहंस पिक्चर्स " च्या " भक्त दामाजी " या चित्रपटातील वरील सर्व खाती भालजीनीच सांभाळली.[१६] अशा रितीने अनेक चित्रपटातील महत्वपूर्ण विभाग त्यांनी यशस्वीरित्या सांभाळले.

" फेमस अरुण चित्र " या भालजींच्या भागीदारीतील चित्रपट निर्मितीगृहाचे काम पुण्याला १९४२ च्या दरम्यान पूर्ण होत आले होते. या संस्थेतर्फे त्यांनी १९४३ साली " सुनबाई " या चित्रपटाच्या चित्रीकरणास सुरुवात केली. पण या दरम्यान पुण्यात मलेरिया या रोगाची साथ आल्याने, भालजीनाही मलेरिया झाला. विश्राम बेडेकरानाही परगावी जावे लागल्याने

आजाराकडे लक्ष न देता भालजींनी चित्रिकरण सुरु ठेवले, पण प्रकृती बिघडल्यामुळे सदर चित्रपट संस्था व चित्रपट निर्मितीगृहाचे हक्क भागीराज सीराज अली हकीम यांना देऊन ते कोल्हापूरला परतले.[९७] कोल्हापूरला येऊन हा चित्रपट त्यांनी पूर्ण केला व " कोल्हापूर सिनेटोन " च्या निर्मितीगृहात १९४१ साली " प्रभाकर पिक्चर्स " ची स्थापना केली.[९८] या चित्रपट संस्थेची एक नाटयशाखा देखील होती. प्रभाकर पिक्चर्स तर्फे भालजींनी पाच मराठी व तीन हिंदी चित्रपटांची १९४९ पर्यंत निर्मिती केली.[९९]

१४ मे, १९४५ रोजी भालजींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्वखर्चाने कोल्हापूरात उभा केला. हा पुतळा तयार करण्याचे काम बाबूराव पेंटर यांनी केले होते.[१००] " रिअल शिवाजी " या शिवाजी महाराजावर टिका करणा-या पुस्तकाच्या लेखकाविरुध्द खटला चालविण्यासाठी देखील भालजींनी आर्थिक मदत व निधी गोळा करुन दिला. त्याचबरोबर इतिहासाच्या अभ्यास असणा-या अनेक तज्ञांच्या साक्षीची तयारीही करुन ठेवली. " रिअल शिवाजी " या पुस्तकावरील बंदी संयुक्त प्रांत शासनाने कायम करुन कोर्ट खर्चासह नुकसान भरपाईही, दाउद खान या लेखकाने द्यावी, असा आदेश न्यायालयाने दिला.[१०१] या उदाहरणावरुन भालजींची शिवनिष्ठा व शिवाजी महाराजांविषयी अभिमान सिध्द होतो.

कोल्हापूर संस्थानात १९४७ साली दत्तक कोणाला घ्यायचे याबद्दल वावड्या उठत होत्या. हिंदू महासभेतील सर्वाधिकारी भालजी होते व छत्रपतींच्या गादीवर भोसले घराण्याचाच वंशज असावा, अशी त्यांनी भूमिका घेतली. देवासचे युवराज विक्रमसिंह पवार यांना दत्तक घेतले जायचे नक्की झाल्यानंतर दत्तक विधानाला विरोध करण्यासाठी हिंदू महासभेचे सर्वाधिकारी या नात्याने जाहिराती, सभा, पत्रके, भित्तीपत्रके इत्यादी साधनांनी आपली

भूमिका स्पष्ट केली.[१०२] पण त्यांना प्रयत्नांना यश आले नाही. पुढे हेच छत्रपती शहाजी व भालजी यांच्यात अतूट स्नेह निर्माण झाला. १९४८ साली गांधीजींच्या वधानंतर दुस-याच दिवशी या खुनाशी हिंदू सभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांचा संबंध असल्याचे वृत्तपत्रांनी प्रसिध्द केले. त्यामुळे ३१ जानेवारी, १९४८ ला संतप्त जमावाने भालजी पेंढारकर यांच्या जयप्रभा चित्रपट निर्मितीगृहाला आग लावली.[१०३] या आगीत संपूर्ण चित्रपट निर्मितीगृह, त्यातील यंत्रसामुग्री व नुकताच पूर्ण केलेला " मीठ भाकर " हा चित्रपटही भस्मसात झाला.[१०४] गांधी हत्येनंतर भालजींना अटक करण्यात आली, पण या हत्येशी त्यांचा काहीही संबंध नाही, हे स्पष्ट झाल्यावर त्यांना सोडण्यात आले.[१०५] कोल्हापूरात यावेळी झालेल्या जळितासंबंधीच्या खटल्यात सर्वात मोठे जळीत भालजींच्या चित्रपट निर्मिती-गृहाचे झाले होते. या संदर्भात केवळ दहा आरोपींना शिक्षा दिल्या गेल्या.[१०६] इतके प्रचंड नुकसान होऊन भालजी नव्या जोमाने पुन्हा चित्रपट निर्मितीच्या कामाला लागले.

१९४९ साली " मीठभाकर " या चित्रपटाची पुनर्निर्मिती करण्यात आली. याचवर्षी " शिलंगणाचं सोनं " या ऐतिहासिक चित्रपटाची निर्मिती देखील करण्यात आली.[१०७] चित्रपट निर्मितीगृह जळाल्याने डगमगून न जाता खंबीरपणे चित्रनिर्मितीस सुरूवात करून एकाहून एक अशा अनेक कलात्मक चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली.

चित्रपटाचे दिग्दर्शन करताना अभिनयातील बारीकसारीक छटादेखील ते स्वत: करून दाखवित असत. चेह-यावरील भाव कसा व्यक्त होतो, ते फार सुंदर दाखवित असत. वक्तशिरपणा, चित्रिकरणाच्यावेळी कडक शिस्त ही देखील भालजींची वैशिष्टये होय.[१०८]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

भालजींनी चित्रपट निर्मितीकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पाहिले नाही. स्वत:ची प्रकाशन संस्था असणे चित्रपट व्यवसायात अनुकूल असते. त्यांचे बंधु बाबूराव पेंढारकरांनी त्यांना प्रकाशन संस्था काढण्यासाठी अनेकदा आग्रह केला, पण भालजींनी त्याकडे लक्ष दिले नाही.[१०९] चित्रपट तिकीट-बारीवर यशस्वी होऊनही भांडवलाअभावी नवा चित्रपट काढण्यात त्यांना बराच अवधी घालवावा लागे.

"अनेक कलात्मक व दर्जेदार चित्रपट सादर करणारे दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद, गीतलेखक म्हणून त्यांनी केलेले कार्य बहुमोल आहे, असे दिसून येते.

व्ही. शांताराम :

शांताराम राजाराम वणकुद्रे उर्फ व्ही. शांताराम यांचा जन्म १८ नोव्हेंबर, १९०१ रोजी कोल्हापूर येथे झाला.[११०] शालेय जीवनापासून नकला व नाटकात काम करण्यासाठी सवय व आवड असल्याने १९१४-१५ साली पुण्याच्या " गंधर्व नटक कंपनी " त प्रवेश केला.[१११] नाटकात लहानसहान भूमिका व नाचात कामे केली. नंतर आर्थिक अडचणीमुळे छापखान्यातही कांही दिवस काम केले.[११२] गोविंदराव टेंबे यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाला तंबो-याची साथ करावी लागत असल्याने ते तंबोरा वाजविण्यासही शिकले. मॅट्रीक परिक्षेस फॉर्म न मिळाल्याने त्यांचे शिक्षण तेथेच थांबले.[११३] शिक्षण थांबविल्यावर पुन्हा नोकरी करायचे त्यांनी ठरविले.

शांताराम बापू हुबळीला रहावयास गेले.[११४] आगगाडीच्या वर्कशॉपमध्ये फिटर चे काम व संध्याकाळी डेक्कन चित्रपटगृहाच्या दारपालाचे

काम सुरु केल्याने त्यांना अनेक चित्रपट पहावयास मिळाले.[११५] आगगाडीच्या डब्यात एक लहानसा अपघात झाला, ते आजारी पडले. त्यामुळे ती नोकरीही सुटली. नंतर एका ठिकाणी ते छायाचित्रण व दुकानाचे फलक रंगविण्याचे काम शिकले.[११६]

त्यांचे मावसबंधु बाबूराव पेंढारकर यांच्या मदतीने त्यांनी २० जून, १९२० ला " महाराष्ट्र फिल्म कंपनी " मध्ये प्रवेश केला.[११७] रंगाने बरबटलेले पेले धुण्यापासून संस्थेची इमारत झाडण्यापासून ते चित्रपटात भूमिका करण्यापर्यंत अनेक लहानमोठी कामे ते करु लागले.[११८] १९२१ साली " वत्सला हरण " या चित्रपटात विष्णूच्या भूमिकेद्वारे त्यांनी चित्रपटात पदार्पण केले.[११९] १९२२ साली ते विवाहबध्द झाले. " वत्सला हरण " या चित्रपटापासून त्यांनी संकलन करण्यास सुरुवात केली. १९२३ साली " सिंहगड ", " श्रीकृष्णावतार ", १९२४ मध्ये " सती पद्मीनी ", १९२५ मध्ये " शहाला शह ", " सावकारी पाश ", " राणा हमीर ", " मायाबाजार " या चित्रपटातून त्यांनी भूमिका केल्या. १९२६ मध्ये " गजगौरी ", " भक्त प्रल्हाद ", " मुरलीवाला " [१९२६] या चित्रपटात काम केले.[१२०] १९२७ ला त्यांनी " नेताजी पालकर " या चित्रपटाचे दिग्दर्शन केशवराव धायबर यांच्यासह केले.[१२१] या चित्रपटाला मुंबईच्या एका संस्थेने सुवर्णपदक दिले. याच वर्षी " सती सावित्री " या चित्रपटातही त्यांनी काम केले. १९२८ मध्ये " महारथी कर्ण ", १९२९ मध्ये " बाजीप्रभू देशपांडे " या चित्रपटात काम केले. याच वर्षी निघालेल्या " निशा सुंदरी " या चित्रपटातही त्यांनी भूमिका केली.[१२२] अभिनय, दिग्दर्शन व इतर तांत्रिक कामात त्यांनी या संस्थेत प्राविण्य मिळविले.

३० एप्रिल, १९२९ ला " महाराष्ट्र फिल्म कंपनी " सोडली व १ जून, १९२९ ला इतर चार भागीदारांसमवेत " प्रभात फिल्म कंपनी " ची स्थापना

केली. या संस्थेतर्फे १९२९ साली " गोपालकृष्ण " हा पहिला चित्रपट सादर केला.[१२३] याचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनीच केले. १९२९ ते १९३३ या काळात " प्रभात फिल्म कंपनी " ने अकरा चित्रपट सादर केले. त्यातील सहा मूक चित्रपट होते. १९३२ साली प्रभातने " अयोध्येचा राजा " हा हिंदी व मराठी या दोन्ही भाषात असणारा पहिला बोलपट निर्मित केला.[१२४] १९३३ साली भारतातील पहिला रंगीत चित्रपट " सैरंध्री " हा देखील " प्रभात फिल्म कंपनी " ने सादर केला. हा चित्रपट जर्मनीहून रंगीत करून आणण्याचे काम व्ही. शांताराम यांनी केले.[१२५] कोल्हापूरात " प्रभात " ने निर्मित केलेल्या अकरा चित्रपटांपैकी दहा चित्रपटाचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनी केले.[१२६] " जुलूम " या १९३१ साली निघालेल्या चित्रपटाचे दिग्दर्शन केशवराव धायबर यांनी केले. या चित्रपटाच्या बाह्य चित्रीकरणासाठी सर्वजण जतला गेले असताना, ऐनवेळी शांताराम बापू आले नाहीत, यावरून चित्रपट संस्थेत स्पर्धा व तेढ या भावना प्रथमपासून रूजू लागल्या होत्या असे दिसते.[१२७]

" प्रभात फिल्म कंपनी " ने विजेची तांत्रिक समस्या निर्माण झाल्याने व कोल्हापूर पेक्षा पुण्याहून मुंबई जवळ पडत असल्याने नोव्हेंबर, १९३३ मध्ये पुण्यास स्थलांतर केले.[१२८] तेथे देखील अनेक कलात्मक व सुंदर चित्रपटांची निर्मिती करण्यात आली. १९४२ ला " प्रभात फिल्म कंपनी " सोडून त्याच वर्षी त्यांनी मुंबई येथे " राजकमल कला मंदिर " ची स्थापना केली.[१२९]

सुरूवातीस अभिनय, नंतर संकलन वगैरे सारखी तांत्रिक कामे व पुढे दिग्दर्शन व निर्मिती असे चित्रपट व्यवसायातील अनेक टप्पे व्ही. शांताराम यांनी यशस्वीपणे पार पाडले. मा. विनायक यांच्या " प्रफुल्ल पिक्चर्स " तर्फे २१. ८. ४५ रोजी " राजकमल " या शांतारामबापूंच्या चित्रपट संस्थेच्या

" शकुंतला " चित्रपटाच्या विजयश्री महोत्सवा निमित्त चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक व्ही. शांताराम व इतर कलाकार, तंत्रज्ञांचा कोल्हापूर येथे सत्कार करण्यात आला. [१३०] चित्रपट निर्मितीतील जवळजवळ सर्व क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविला.

श्री. बाबूराव पेंटर यांनी शांताराम बापू " प्रभात फिल्म कंपनी " सोडणार हे कळल्यावर " शांताराम प्रभातमधून जाणार असल्याची वार्ता खरी असेल, तर प्रभातचे आणि त्यांच्या मालकांचे दुर्दैव म्हणावे लागेल. प्रभातच्या मालकांनी शांतारामला सोडू नये. कला आणि धंदा या दोन्ही गोष्टी साधणारा फक्त शांतारामच आहे " असे उद्गार काढले होते. [१३१] हे उद्गार म्हणजे त्यांच्या गुरूने दिलेली यशाची पावतीच होती व यावरून चित्रपटाचा दर्जा व व्यावसायिक यश, या दोन्हींची त्यांनी उत्तम प्रकारे सांगड घातली होती, असे म्हणता येईल.

वर नमूद केलेल्या बाबूराव पेंटर, भालजी पेंढारकर व बाबूराव पेंढारकर व व्ही. शांताराम या व्यक्तींना चित्रपट निर्मितीच्या सर्वांगाचे सखोल ज्ञान होते. म्हणून चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन, अभिनय, संकलन, कथा - पटकथा, संवाद व गीत लेखन या सर्व क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान केले आहे. याचबरोबर अनेकांनी यातील दोन-तीन क्षेत्रात विशेष नैपुण्य संपादन केल्याचे दिसते.

चित्रपटातील कलाकारांच्या अभिनयावर चित्रपटाचे बरेचसे यश अवलंबून असते. अगदी सुरुवातीच्या काळात या क्षेत्रात बाळासाहेब यादव हे नांव आघाडीवर होते. त्यांनी " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " सैरंध्री ", " वत्सलाहरण ", " दामाजी " अशा अनेक चित्रपटात भूमिका केल्या. [१३२]

त्याचप्रमाणे " राष्ट्र सिनेटोन " च्या " जादूगारिण " व " महाराष्ट्र पिक्चर्स " च्या " बाजीप्रभू देशपांडे " या चित्रपटातून भूमिका तर केल्याच पण सदर चित्रपटाचे दिग्दर्शनही. त्यांनी स्थापन केलेल्या " छत्रपती सिनेटोन " च्या " मराठयातील दुही " व " कुरुक्षेत्र " या चित्रपटाचे दिग्दर्शन व अभिनय या दोन्ही बाजू त्यांनी सांभाळल्या. [१३३] या व्यतिरिक्त इतरही चित्रपटातून त्यांनी कामे केली.

झुंझारराव पवार हे देखील त्या काळात अभिनेते म्हणून प्रसिध्दीस आले होते. " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " कल्याण खजिना ", " कृष्णावतार ", " शहाला शह " इ. अनेक चित्रपटातून त्यांनी कामे केली. " छत्रपती सिनेटोन ", " कोल्हापूर सिनेटोन " च्या चित्रपटातूनही त्यांनी भूमिका केल्या. [१३४] याच काळात अनुसयाबाई व गुलाबबाई या स्त्री कलावंतदेखील आघाडीवर होत्या. " सैरंध्री ", " गजगौरी " इ."महाराष्ट्र फिल्म कंपनी" च्या चित्रपटातून त्यांनी अभिनय केला. [१३५] कमलादेवी या अभिनेत्रीने " महाराष्ट्र फिल्म कंपनी " च्या " राजा हमीर ", " मायाबाजार " इ. चित्रपटांबरोबरच " प्रभात फिल्म कंपनी " च्या " गोपाळ कृष्ण ", " उदयकाल " इ. चित्रपटातही कामे केली. [१३६]

अभिनय क्षेत्रात बोलपटाच्या काळात गोविंदराव टेंबे हे नांव सुपरिचित होऊ लागले होते. " प्रभात " च्या " अयोध्येचा राजा ", " मायामच्छिंद्र " यासारख्या चित्रपटातून कामे केली. याच काळात दुर्गा खोटे यादेखील आघाडीवर होत्या. " प्रभात " च्या वरील चित्रपटां व्यतिरिक्त इतरही अनेक चित्रपटातून त्यांनी भूमिका केल्या. माने पेहेलवान, विजया [ "खुनी खंजीर", "चंद्रसेना" इ. ] या नांवानाही या काळात प्रसिध्दी मिळाली. [१३७] लीलावती यांनी

" चंद्रसेना ", " सैरंध्री ", " सिंहगड " या " प्रभात फिल्म कंपनी " च्या चित्रपटांबरोबर " कोल्हापूर सिनेटोन " च्या " कालीयामर्दन ", " आकाशवाणी " इ. चित्रपटातून कामे केली.[१३८] इतरही चित्रपटातून त्यांनी अभिनय केला.

मा. विठ्ठल यांनी या क्षेत्रात " कल्याणचा खजिना ", " सासुरवास " " मीठभाकर " अशा अनेक चित्रपटातून कामे केली. " आलमआरा " या पहिल्या बोलपटात त्यांनी प्रमुख भूमिका केली.[१३९] चित्रपटसृष्टीत " इंडियाना डग्लस " म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. अभिनयाबरोबर दिग्दर्शन क्षेत्रातही आपले नांव उज्ज्वल करणा-या मा. विनायकांनी " हंस पिक्चर्स " च्या " ब्रम्हचारी ", " ज्वाला ", " प्रेमवीर " अशा अनेक चित्रपटात भूमिका करुन त्याचे दिग्दर्शनही केले.[१४०] त्यांनी स्थापलेल्या " प्रफुल्ल चित्र संस्थे " च्या " माझे बाळ ", " चिमुकला संसार " इ. चित्रपटाचे दिग्दर्शन व भूमिका या दोन्हीही बाजू सांभाळल्या.[१४१] या आधी त्यांनी " प्रभात " च्या " सिंहगड ", " माया मच्छिंद्र " इ. चित्रपटातूनही कामे केली.[१४२] " मिनाक्षी ",[" ब्रम्हचारी ", " माझे बाळ ","ब्रॅण्डीची बाटली" ] आशालता [ "प्रेमवीर","ज्वाला" ] या अभिनेत्रींची देखील नावे सुपरिचित होती.[१४३]

चित्रपटातील अभिनयाच्या क्षेत्रात राजा परांजपे यांनीदेखील या काळात प्रसिध्दी मिळविली. " शालिनी सिनेटोन " च्या " सावकारी पाश ", " प्रतिभा ", " ध्रुवकुमार " तर " प्रभाकर पिक्चर्स " च्या " सासुरवास " इ. अनेक चित्रपटात त्यांनी कामे केली.[१४४] चंद्रकांत ["मीठभाकर", "जय मल्हार" इ. ] सुर्यकांत [ "ध्रुव", "शिलंगणाचं सोनं", "सासुरवास" इ. ] सुलोचना [ "जयभवानी", "मीठभाकर" इ. ] ही नावेदेखील या विभागात प्रसिध्द झाली.[१४५] या व्यतिरिक्त शांता आपटे, ललिता पवार, शोभना

समर्थ, दादा साळवी, दामुआण्णा मालवणकर, इब्राहीम, जयशंकर दानवे, वसंत शिंदे अशा अनेक कलाकारांनी या क्षेत्रात प्रसिध्दी मिळविली.

चित्रपटाचे दिग्दर्शन ही देखील महत्वाची बाजू असून वर नमूद केलेल्या दिग्दर्शकां व्यतिरिक्त विश्राम बेडेकर हे नावही या विभागात सुपरिचित झाले होते. त्यांनी " न्यू हंस " च्या " पहिला पाळणा ", " पैसा बोलतो आहे " इ. चित्रपटाचे केवळ दिग्दर्शनच नाही तर लेखनही केले. [१४६] के. पी. भावे यांनी " अयोध्येची राणी ", " ध्रूवकुमार " या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. [१४७]

चित्रपटांच्या कथा लेखनात प्र. के. अत्रे [ "ब्रम्हचारी", "ब्रॅण्डीची बाटली", "प्रेमवीर" इ. ] वि. स. खांडेकर [ "देवता", "सुखाचा शोध", "छाया" इ. ] ह. ना. आपटे [ "सावकारी पाश", "सिंहगड" इ. ] यांनी महत्वाचा वाटा उचलला. [१४८]

चित्रपटांतील संगीताचा चित्रपटाच्या यशात मोठा वाटा असतो. या क्षेत्रात गोविंदराव टेंबे हे नांव आघाडीवर होते. त्यांनी " प्रभात फिल्म कंपनी " च्या " अयोध्येचा राजा ", " सैरंध्री ", " अग्निकंकण " इ. व इतर चित्रपटांनाही संगीत दिले. [१४९] दादा चांदेकर हे नांव या क्षेत्रात सुपरिचित होते. त्यांनी " कालिया मर्दन ", " ज्वाला " अशा अनेक चित्रपटांना संगीत दिले. [१५०] तर भुर्जीखान यांनी " जादुगारीण ", " कुरुक्षेत्र " या चित्रपटातील संगीताची बाजू सांभाळली. [१५१] या व्यतिरिक्त या क्षेत्रात आण्णासाहेब माईणकर [ "मराठ्यातील दुही", "धर्मवीर", "प्रेमवीर ][१५२] गुंडोपंत वालावलकर [ "आकाशवाणी", "विलासी ईश्वर" ][१५३] दत्ता डावजेकर [ "माझं बाळ", "चिमुकला संसार" ][१५४] ही नावे, या व्यक्ति आघाडीवर होत्या.

चित्रपट निर्मितीचे महत्वाचे अंग म्हणजे छायाचित्रण हे होय. यास तांत्रिक कौशल्याची आवश्यक असते. या क्षेत्रात नांव मिळविणारे व अनेक चित्रपटांच्या छायाचित्रणाशी निगडीत असणा-यांमध्ये विशेष उल्लेख केशवराव

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

धायबर यांचा करता येईल. त्यांनी " प्रभात फिल्म कंपनी " या पहिला बोलपट " अयोध्येचा राजा " चे छायाचित्रण केले. " अग्निकंकण ", " सैरंध्री ", " सिंहगड " अशा अनेक चित्रपटांच्या छायाचित्रणाची महत्वाची बाजू सांभाळली.[१५५] " हंस पिक्चर्स " व " न्यू हंस पिक्चर्स " च्या चित्रपटाचे छायाचित्रण करण्याची मदार पांडुरंगराव नाईक यांच्यावर असल्याचे दिसते. त्यांनी "ब्रम्हचारी", "ज्वाला", " सुखाचा शोध ", " अर्धांगी " व " पहिला पाळणा ", " भक्त दामाजी " इ. अनेक चित्रपटाचे छायाचित्रण त्यांनी केले.[१५६] के. माचवे, एस. पी. शिंदे यांनीदेखील अनेक चित्रपटांच्या [ "मोहिनी","कान्होपात्रा", "मायाबाजार" इ. ] छायाचित्रणाचा विभाग सांभाळला.[१५७] वासुदेव कर्नाटकी यांनी "प्रेमवीर", "सासुरवास" "ध्रुव" अशा चित्रपटाचे छायाचित्रण केले.[१५८]

छायाचित्रणा प्रमाणेच तांत्रिक कौशल्यावर आधारीत ध्वनीमुद्रण हा विभाग असतो. " प्रभात फिल्म कंपनी " च्या अनेक चित्रपटाचे ध्वनिमुद्रण विष्णुपंत दामलेनी केले. [ "मायामच्छिंद्र", "अग्निकंकण", "सैरंध्री" इ. ][१५९] या क्षेत्रात चिंतामणराव मोडक हे नांवदेखील सुपरिचित झाले होते. त्यांनी "कोल्हापूर सिनेटोन " च्या "कालियामर्दन", "विलासी ईश्वर", "आकाशवाणी" या चित्रपटातील ध्वनिमुद्रणाचा विभाग सांभाळला.[१६०] इतरही अनेक चित्रपटाचे [ "स्वराज्य सीमेवर", "ज्वाला", "ब्रम्हचारी" इ. ][१६१] ध्वनिमुद्रण त्यांनी केले. गणपत भोळे यांनी " भक्त दामाजी ", " पहिला पाळणा " इ. " न्यू हंस पिक्चर्स " च्या चित्रपटाचे ध्वनिमुद्रण केले.[१६२]

संकलन या महत्वाच्या तांत्रिक विभागात माधव कांबळे हे नांव आघाडीवर होते. कोल्हापूरातील अनेक चित्रपट संस्थांच्या चित्रपटाचे संकलन त्यांनी केले. "ब्रॅण्डीची बाटली", "देवता", "चिमुकला संसार",

"गजाभाऊ" इ. अनेक चित्रपटांच्या संकलनाचे काम त्यांनी केले. [१६३] र. शं. जुन्नरकर हे नांवदेखील या क्षेत्रात सुपरिचित झाले होते. त्यांनी "प्रेमवीर", "ज्वाला" इ. चित्रपटाचे संकलन केले. [१६४] चित्रपटातील रसायन या महत्वपूर्ण व कौशल्याच्या विभागात गोपाळ कांबळे हे नांव सुपरिचित झाले होते. "ब्रम्हचारी", "ज्वाला", "देवता" यासारख्या अनेक चित्रपटातील रसायन विभाग त्यांनी सांभाळला. [१६५]

चित्रपटातील कलादिग्दर्शन या महत्वपूर्ण व कलात्मक विभागात साहेबमामा फत्तेलाल यांनी प्रसिध्दी मिळविली. " अयोध्येचा राजा " "अग्निकंकण" अशा अनेक चित्रपटात त्यांनी कलादिग्दर्शन केले. [१६६] या व्यतिरिक्त शंकरराव शिंदे [ "आकाशवाणी", "कालियामर्दन" इ. ][१६७] गणपतराव वडणगेकर [ "प्रतिभा", "सावकारी पाश" इ. ] व वि. ह. पळणीटकर [ "ब्रॅण्डीची बाटली," "ज्वाला" इ. ] या व्यक्ति या क्षेत्रात सुपरिचित झाल्या होत्या. [१६८] त्याचप्रमाणे रंगभूषा व वेशभूषा या चित्रपटातील दोन विभागात अनुक्रमे शंकर गौड [ "ब्रम्हचारी", "देवता" इ. ] व विश्वास [ "ब्रॅण्डीची बाटली", "देवता" इ. ] ही नावे सुपरिचित होती. [१६९] अशा त-हेने निरनिराळया विभागात वर नमूद केलेल्या व्यक्तिंनी आपला ठसा उमटविला.

चित्रपट विश्वात ज्यांनी पुढे लोकप्रियता व किर्ती मिळविली त्यातील ब-याचजणांचा प्रारंभी कोल्हापूरशी संबंध आला. गायन व संगीत विश्वाशी निगडीत सुप्रसिध्द व्यक्तिमत्व लता मंगेशकर यांनी पहिले हिंदी गाणे " प्रफुल्ल पिक्चर्स " ज्या " गजाभाऊ " या चित्रपटासाठी गायिले. याच संस्थेच्या या चित्रपटाव्यतिरिक्त " चिमुकला संसार ", " माझं बाळ " या चित्रपटातून भूमिका करुन चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. [१७०]

प्रसिध्द निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते राजकपूर यांनीदेखील " प्रभाकर पिक्चर्स " च्या " वाल्मिकी " या हिंदी चित्रपटात काम करून आपली या सृष्टीतील कारकिर्द सुरु केली. [१७१] संगीत दिग्दर्शक व गायक म्हणून प्रसिध्द पावलेले सी. रामचंद्र यांनी " सम्राट सिनेटोन " च्या " नागानंद " या चित्रपटात भूमिका करून त्यातील गीतही गायिले. [१७२]

सुप्रसिध्द साहित्यिक पु.ल. देशपांडे यांनी येथे चित्रित झालेल्या " वंदे मातरम् " या चित्रपटात भूमिका केली. त्यांच्याबरोबर सुनिता देशपांडे या त्यांच्या पत्नीनेही काम केले. [१७३] नामांकित साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांनीदेखील " न्यू हंस पिक्चर्स " च्या " भक्त दामाजी ", " पहिला पाळणा " या चित्रपटाचे गीतलेखन करून " पहिला पाळणा " सारख्या चित्रपटात भूमिकाही केली, [१७४] व पुढे चित्रपटसृष्टीत मोठ्या प्रमाणात यश मिळविले.

अशा रितीने चित्रपटसृष्टीत अनेक व्यक्तींनी स्वत:चा दबदबा व विशिष्ठ स्थान निर्माण केलेले दिसून येते.

संदर्भग्रंथ व तळटीपा :


१] भिडे ग. रं., बाबा गजबर, कलामहर्षि बाबूराव पेंटर, पृ. ७.

२] कित्ता, पृ. ४०.

३] कित्ता, पृ. ४०.

४] कित्ता, पृ. ४१,

५] कित्ता, पृ. ४१.

६] कित्ता, पृ. १०४.

७] कित्ता, पृ. ८.

८] कित्ता, पृ. ४२.

९] कित्ता, पृ. ४४.

१०] कित्ता, पृ. ४३.

११] कित्ता, पृ. १०९.

१२] पेंढारकर बाबूराव, चित्र आणि चरित्र, पृ. ३०.

१३] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ४४.

१४] कित्ता, पृ. ४५.

१५] कित्ता, पृ. ४६.

१६] कित्ता, पृ. ४९.

१७] कित्ता, पृ. ५५.

१८] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ४९.

१९] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६९, १७२.

२०] कित्ता, पृ. ५९.

२१] कित्ता, पृ. १७३.

२२] कित्ता, पृ. १७३, १७४

२३] कित्ता, पृ. १६९, १७०, १७२, १७३.

२४] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ५४.

२५] कित्ता, पृ. ६४.

२६] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ७०.

२७] ग. रं. भिडे यांनी सिनेमासृष्टी हे चित्रपटविषयक मासिक या काळात
सुरु केले होते. त्यांनी कलामहर्षि बाबूराव पेंटर या पुस्तकात बाबूराव
पेंटरांविषयी माहिती लिहीली आहे.

२८] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. ६६.

२९] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. २८२.

३०] कित्ता, पृ. ३.

३१] कित्ता, पृ. १८.

३२] कित्ता, पृ. २८२.

३३] कित्ता, पृ. २३.

३४] कित्ता, पृ. ४०.

३५] कित्ता, पृ. ४२.

३६] कित्ता, पृ. ४७.

३७] कित्ता, पृ. ५१.

३८] कित्ता, पृ. ५५, ५६.

३९] व्ही. शांताराम, शांतारामा, पृ. ४३.

४०] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ७०, ७१.

४१] कित्ता, पृ. २८२.

४२] कित्ता, पृ. ७५, ७६.

४३] कित्ता, पृ. ८०.

४४] कित्ता, पृ. ८५.

४५] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२, ५७३

४६] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ११२.

४७] कित्ता, पृ. ११६.

४८] कित्ता, पृ, २७७.

४९] कित्ता, पृ. ११८.
५०] कित्ता, पृ. १२२.
५१] कित्ता, पृ. २८३.
५२] कित्ता, पृ. १२६.
५३] संपा. वसंत साठे, चित्रसंपदा, पृ. १४.
५४] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १२८.
५५] कित्ता, पृ. १५१.
५६] कित्ता, पृ. १५२.
५७] कित्ता, पृ. २८४.
५८] कित्ता, पृ. १५८, १५९.
५९] कित्ता, पृ. २८४.
६०] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २३, २५.
६१] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १७५.
६२] कित्ता, पृ. १७९.
६३] कित्ता, पृ. २८५.
६४] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २७.
६५] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. २८५.
६६] पेंढारकर भालजी, साधा माणूस, पृ. २.
६७] कित्ता, पृ. ८.
६८] कित्ता, पृ. ९.
६९] कित्ता, पृ. ९.
७०] कित्ता, पृ. १९.
७१] कित्ता, पृ. २२.
७२] कित्ता, पृ. २३.
७३] कित्ता, पृ. २४.

७४] कितता, पृ. २५.

७५] कितता, पृ. २७.

७६] कितता, पृ. २८.

७७] कितता, पृ. ३०, ३१, ३६, ३७.

७८] कितता, पृ. ३९, ४०.

७९] कितता, पृ. ४६.

८०] कितता, पृ. ४७.

८१] संपा. ग. रं. भिडे, पु. ल. देशपांडे, कोल्हापूर दर्शन, पृ. १९०.

८२] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. ५३, ५४.

८३] कितता, पृ. ५३, ६०, ६१, ६२.

८४] कितता, पृ. ६४.

८५] कितता, पृ, ६७, ६८.

८६] कितता, पृ. ६८.

८७] कितता, पृ. ७०.

८८] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ७५.

८९] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. ७१.

९०] कितता, पृ. ७२.

९१] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७२.

९२] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. ७७, ७९.

९३] कितता, पृ. ८२.

९४] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १०.

९५] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३७, २३८.

९६] कितता, पृ. २३८.

९७] कितता, पृ. १०९, ११०.

९८] सौ. लीला पेंढारकर यांची मुलाखत.

९९] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३८, २३९.

१००] कित्ता, पृ. १२८.

१०१] कित्ता, पृ. १२९, १३१.

१०२] कित्ता, पृ, ११०, १११.

१०३] कित्ता, पृ, १५०, १५१.

१०४] सौ.लीला पेंढारकर यांची मुलाखत.

१०५] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. १५३, १६०.

१०६] कित्ता, पृ. १६१.

१०७] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. २९, ३०.

१०८] संपा. प्रतापसिंह जाधव, दै.पुढारी, दि. ५/१/९२, पृ. ५.

१०९] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. १२९.

११०] व्ही.शांताराम, उपरोक्त, पृ. ५७१.

१११] कित्ता, पृ. २२.

११२] कित्ता, पृ. २४.

११३] कित्ता, पृ, ३५.

११४] कित्ता, पृ. ३९.

११५] कित्ता, पृ. ४०.

११६] कित्ता, पृ. ४०.

११७] पेंढारकर बाबूराव, उपरोक्त, पृ. ५६.

११८] व्ही.शांताराम, उपरोक्त, पृ. ४७, ४८.

११९] कित्ता, पृ. ५०.

१२०] कित्ता, पृ. ५७१.

१२१] भिडे ग.रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १७१.

१२२] व्ही.शांताराम, उपरोक्त, पृ. ५७२.

१२३] कित्ता, पृ. ५७२.

१२४] कित्ता, पृ. ५७३.

१२५] कित्ता, पृ. १३९.

१२६] कित्ता, पृ. ५७२, ५७३.

१२७] संपा. गोविंद तळवलकर, दै. महाराष्ट्र टाईम्स, दि. २२.७.९३, पृ. ३.

१२८] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. १३८.

१२९] कित्ता, पृ. ५७५.

१३०] संपा. बाळासाहेब पाटील, साप्ता. सत्यवादी, दि. ५.९.१९४५, पृ. ७.

१३१] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, पृ. १६७, १६८.

१३२] कित्ता, पृ. १६९, १७०.

१३३] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ९, १०.

१३४] भिडे ग. रं., बाबा गजबर, उपरोक्त, २६, २७, १७०.

१३५] कित्ता, १६९, १७०.

१३६] व्ही. शांताराम, उपरोक्त, पृ. ५७१, ५७२.

१३७] कित्ता, पृ. ५७२.

१३८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ११, १३.

१३९] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. ७१, २३९.

१४०] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६, १७.

१४१] कित्ता, पृ. २५, २६.

१४२] कित्ता, पृ, ९, ११.

१४३] कित्ता, पृ. १६, १७.

१४४] कित्ता, पृ. १४, १७, २६.

१४५] कित्ता, पृ. १६, २६, ३०.

१४६] संपा. सुधीर फडके, चित्रशारदा, पृ. २५, २६.

१४७] कित्ता, पृ. १४, १९.

१४८] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १४, १६, १८, १९.

१४९] कित्ता, पृ. ९, ११.

१५०] कित्ता, पृ. १३, १७.

१५१] कित्ता, पृ. १०, १५.

१५२] कित्ता, पृ. ९, १५.

१५३] कित्ता, पृ. ११, १३.

१५४] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २९.

१५५] कित्ता, पृ. १, ४.

१५६] कित्ता, पृ. १७, १९.

१५७] कित्ता, पृ. ११, २०.

१५८] कित्ता, पृ. १२, १३.

१५९] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. ९, ११.

१६०] कित्ता, पृ. ११, १३.

१६१] कित्ता, पृ. १६.

१६२] कित्ता, पृ. २३.

१६३] संपा. सुधीर फडके, उपरोक्त, पृ. २९, ३१.

१६४] कित्ता, पृ. १२, १४.

१६५] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १६, १९.

१६६] कित्ता, पृ. ९.

१६७] कित्ता, पृ. ११, १३.

१६८] कित्ता, पृ. १६, १८.

१६९] कित्ता, पृ. १८.

१७०] कित्ता, पृ. २५, २६.

१७१] पेंढारकर भालजी, उपरोक्त, पृ. २३९.

१७२] संपा. वसंत साठे, उपरोक्त, पृ. १३.

१७३] कित्ता, पृ. २८.

१७४] कित्ता, पृ. २३.